# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः09.08.2026** **वारःरविवार**

1. संपूर्ण देशभर आज हर घर तिरंगा मोहिमेचा आरंभ
2. अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी व्हान्स यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा
3. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज पुदुचेरीच्या दौऱ्यावर आणि
4. ताश्कंद इथं सुरू असलेल्या आशियाई कनिष्ठ भारोत्तोलन स्पर्धेत भारताला आणखी एक सुवर्ण आणि रौप्य पदक.

**<u>हर घर तिरंगा</u>**

येत्या स्वातंत्र्यदिनाच्या अनुषंगानं आजपासून 17 ऑगस्टपर्यंत चालणाऱ्या हर घर तिरंगा मोहिमेला आजपासून सुरुवात होत आहे. देशातील प्रत्येक नागरिकाला आपल्या घरावर राष्ट्रध्वज फडकवण्यास प्रोत्साहन देऊन देशप्रेम, राष्ट्रीय एकता आणि भारताच्या सांस्कृतिक वारशाच्या गौरव सोहळ्यात त्यांना सहभागी करून घेण्याच्या उद्देशानं 2022 पासून दरवर्षी ही मोहीम राबवण्यात येते. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सव सोहळ्यापासून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाचं आता सर्वात मोठा लोकसहभाग असलेल्या चळवळीत रुपांतर झालं आहे. वंदेमातरम या राष्ट्रीय गीताला यंदा दीडशे वर्ष पूर्ण होत असताना यावर्षीची हर घर तिरंगा मोहीम खास असणार आहे. या सोहळ्याच्या निमित्तानं संपूर्ण देशभर वंदेमातरम या गीताच्या सामूहिक गायनाच्या कार्यक्रमांचं आयोजन केलं जाणार आहे. स्वातंत्र्य दिन सोहळ्याचाच एक भाग म्हणून 14 ऑगस्ट रोजी देशभर फाळणीच्या यातनांचा स्मरण दिन पाळण्यात येणार आहे. दोनशेहून अधिक भारतीय दूतावास, उच्चायुक्तालयं आणि वाणिज्य दूतावांसाच्या वतीनंही यानिमित्तानं विविध कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत, त्यामध्ये 'सूर्यपथ तिरंगा डिजिटल रिले' हा विशेष लक्षवेधी कार्यक्रम असेल.

**<u>मोदी-व्हान्स चर्चा</u>**

अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी व्हान्स यांनी काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दूरध्वनी करून त्यांच्याशी चर्चा केली. पंतप्रधानांनी समाजमाध्यमावरील संदेशात ही माहिती दिली आहे. यावेळी व्हान्स यांच्याशी महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये भारत-अमेरिका सर्वंकष जागतिक धोरणात्मक भागीदारी आणखी दृढ करण्याच्या मार्गांविषयी चर्चा झाल्याचं पंतप्रधान मोदींनी म्हटलं आहे.

**<u>पंतप्रधान आय.आय.टी</u>**

भारतीय तंत्रशिक्षण संस्थेच्या म्हणजेच आयआयटीच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रहित हे ध्येय केंद्रस्थानी ठेवून आपल्या ज्ञानाचा देशाला लाभ मिळावा यासाठी प्रयत्न करावेत, असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आयआयटी दिल्लीच्या 57 व्या दीक्षांत सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. प्रत्येक पिढीला आपल्या काळातील विशिष्ट आव्हानांचा सामना करावा लागतो आणि ती पिढी आपली राष्ट्रीय जबाबदारी पार पाडत असते. इथून पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांची पुढील 30 ते 35 वर्षांत देशाच्या 'विकसित भारता'च्या वाटचालीत महत्त्वाची भूमिका असेल असंही त्यांनी नमूद केलं. आयआयटी दिल्लीच्या सोनिपत परिसरात नव्याने उभारण्यात आलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ताविषयक परमप्रज्ञा या उच्च क्षमता प्रसंगणक सुविधेचं उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आलं.

**शहा-मुंबई**

नागरी सहकारी बँकांनी सायबर आणि डिजिटल सुरक्षा प्रणाली आणखी बळकट करण्याची गरज केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी काल अधोरेखित केली. मुंबईत सहकार नवक्रांती या कार्यक्रमाला ते संबोधित करत होते. नागरी सहकारी बँकांसाठी 24 तास कार्यरत असलेल्या सुरक्षा केंद्राचं उद्घाटन, तसंच राष्ट्रीय नागरी सहकारी वित्तीय आणि विकास महामंडळाच्या नव्या कार्यालय संकुलाचं उद्घाटन त्यांच्या हस्ते काल झालं. त्यावेळी ते बोलत होते. सहकार सीबीएस प्रणालीशी यशस्वीरीत्या जोडल्या गेलेल्या पहिल्या सहा नागरी सहकारी बँकांच्या प्रतिनिधींचा सत्कार यावेळी करण्यात आला. राष्ट्रीय सेवा बंडलअंतर्गत 'कोर बँकिंग सर्व्हिस' आणि संबंधित सेवांचं लोकार्पण यावेळी झालं. देशातल्या सहकारी संस्थांपैकी 70 टक्के संस्था महाराष्ट्र, गुजरात, गोवा आणि कर्नाटकात आहेत, त्यामुळे NUCFDC चं मुख्यालय दिल्लीतून महाराष्ट्रात हलवण्याची घोषणा शहा यांनी केली.

**शहा पुदुचेरी दौरा**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा दोन दिवसांच्या पुदुचेरीच्या अधिकृत भेटीवर असून काल ते तामिळनाडूतील तिरुवन्नामलाई इथून पुदुचेरीत दाखल झाले. तिथं पोहचल्यानंतर त्यांनी पुदुचेरीच्या लोकभवनात जाऊन नायब राज्यपाल के. कैलाशनाथन यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. तत्पूर्वी शहा यांचं पुदुचेरीचे मुख्यमंत्री एन रंगासामी यांनी आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांनी स्वागत केलं. अमित शहा आज पुदुचेरीत विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत.

**अमेरिका-इराण**

अमेरिका आणि इराण यांच्यात अलीकडेच झालेल्या सामंजस्य करारानुसार इराण शांततेचा मार्ग स्वीकारेल, असं इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी सांगितलं. मात्र यासाठी अमेरिकेकडून विश्वासाचं वातावरण निर्माण करण्यास सहकार्य केलं जाणं आवश्यक असल्याचं ते म्हणाले. अमेरिकेसोबतच्या वाटाघाटींमध्ये आपण परस्पर कृतीवर भर देत असून इराण अमेरिकेच्याच प्रमाणात करारातील वचनबद्धतेचं पालन करेल, असंही पेझेश्कियान यांनी नमूद केलं. आपल्या देशाकडे सामर्थ्य आणि एकजूट आहे. तेहरानला शरणागती पत्करण्यास भाग पाडता येऊ शकणार नाही, असंही ते म्हणाले.

**ब्रिक्स**

ब्रिक्स गटातील देशांच्या सांस्कृतिक मंत्र्यांची 11 वी बैठक काल भोपाळ इथं पार पडली. भारताच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत सांस्कृतिक संबंध दृढ करण्याच्यादृष्टीनं 'भोपाळ जाहीरनामा' स्वीकारण्यात आला. सांस्कृतिक वारशाचं जतन संवर्धन करण्यावर तसंच कलाकारांना व्यापक संधी मिळण्यासाठी डिजिटल मंच मिळवून देण्यावर सहभागी देशांनी सहमती दिली. 10 ब्रिक्स सदस्य आणि 4 भागीदार देशांसह एकंदर 14 देशांच्या प्रतिनिधींनी बैठकीत सहभाग घेतला.

**ऊर्जा क्षमता वाढ**

भारताच्या नवीकरणीय ऊर्जा क्षमतेत गेल्या 12 वर्षात 400 टक्क्यांनी वाढ झाल्याचं नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी म्हटलं आहे. भारतानं गैर जीवाश्म स्त्रोतांपासूनन वीज निर्मिती क्षमतेचा 300 गिगावॅटचा टप्पा ओलांडत स्वच्छ ऊर्जा क्षेत्रात महत्वपूर्ण कामगिरी केली असल्याचं त्यांनी सांगितलं.

**झारखंड**

झारखंडमधल्या भरती परीक्षांमधील कथित अनियमिततेबाबतचा पेच आता सुटण्याच्या मार्गावर असल्याचं चित्र आहे. आंदोलनकर्ते विद्यार्थी आणि झारखंड सरकार यांच्यात आज दुपारी चर्चेची पुढची फेरी होणार आहे. राज्य सरकारनं काल रांचीमध्ये आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विविध गटांशी चर्चा केली. ही चर्चा सकारात्मक वातावरणात पार पडल्याचं चर्चेनंतर सरकारी प्रतिनिधींनी सांगितलं. परीक्षा प्रणालीमध्ये सर्वसमावेशक सुधारणा करण्यासाठी कटिबद्ध असल्याचं सरकारकडून सांगण्यात आलं.

**अमरनाथ यात्रा**

जम्मू आणि काश्मीरमध्ये सुरू असलेला पाऊस, तीर्थयात्रेच्या मार्गांची दुरुस्ती आणि पुढील काही दिवसांत खराब हवामानाचा अंदाज यामुळे पहलगाम आणि बालताल या दोन्ही मार्गांवरून होणारी वार्षिक अमरनाथ यात्रा आजपासून तात्पुरत्या कालावधीसाठी स्थगित करण्यात आली आहे. मार्गांची स्थिती आणि भारतीय हवामान विभागाने दिलेला हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.

**'मेघालय सदन'**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल नवी मुंबईतल्या खारघर इथं 'मेघालय सदन' च्या जमीनचं हस्तांतरण आणि भूमिपूजन झालं. यावेळी मुख्यमंत्र्यांनी दोन्ही राज्यांमधल्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संबंधांवरही प्रकाश टाकला. या कार्यक्रमाला मेघालयचे मुख्यमंत्री कॉनराड के. संगमा आणि उपमुख्यमंत्री प्रेस्टोन टिनसोंग हे देखील उपस्थित होते.

**वणवा-कॅनडा**

पश्चिम कॅनडातल्या ओकानगन सरोवराच्या परिसरात वेगाने पसरणाऱ्या वणव्यांनंतर या भागात आणीबाणी जाहीर करण्यात आली आहे. या भागातल्यासुमारे 20 हजार नागिरकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं. या भागात 100 हून अधिक वणवे पेटले असून उष्ण वारे आणि या भागात पडलेल्या दुष्काळामुळे या वणव्यांवर नियंत्रण मिळवणं कठीण होत आहे. या भागात अद्याप काही नागरिक अडकले आहेत का, याचा शोध बचाव पथकं घेत आहेत.

**भारोत्तोलन**

उझबेकिस्तानमधील ताश्कंद येथे सुरू असलेल्या आशियाई कनिष्ठ भारोत्तोलन स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी आपली उत्कृष्ट कामगिरी काल कायम राखली. पुरुषांच्या कनिष्ठ गटातील 60-किलो वजनी गटात एक सुवर्ण आणि एक रौप्य पदक पटकावले. तोमचौ मीतेई यानं तीन तर गुरुनाडू सनापती याने दोन पदके जिंकली.

**हवामान**

भारतीय हवामान विभागानं आज उत्तराखंड आणि छत्तीसगडमध्ये मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा नारिंगी बावट्याचा इशारा दिला आहे. तसेच, हरियाणा, चंदीगड, हिमाचल प्रदेश, पंजाब, उत्तरप्रदेश, बिहार, राजस्थान, झारखंड, मध्य प्रदेश आणि ईशान्य भारतातील काही भागांत आज मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

# याबरोबर हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.